दुतियो पाठो ।

# पठम धम्मसङ्गीति निदानं ।

तथागत बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर वितरागी आणि अवितरागी भिक्खूंची शारीरिक, मानसिक व सामाजिक अवस्था कशी होती याची माहिती या पाठामध्ये आलेली आहे.

वृद्ध सुभद्र जो अवितरागी आहे, अविनयशील आहे तो भिक्खूंना कसे स्वैराचारी जगण्यास प्रवृत्त करतो व सङ्घभेदी कृत्यांना कशी चालना देतो याचे दिग्दर्शनही या पाठामध्ये करण्यात आलेले आहे. पठमधम्मसङ्गीतीच्या आयोजनाची व धम्म आणि विनयाचे संगायन करण्याच्या पार्श्वभूमीची प्राथमिक कारणे या पाठामध्ये पाहायला मिळतात.

---

तेन खो पन समयेन सुभद्दो नाम वुड्ढपब्बजितो तस्सं परिसायं निसिन्नो होति । अथ खो सुभद्दो वुड्ढपब्बजितो ते भिक्खू एतदवोच - ''अलं, आवुसो, मा सोचित्थ, मा परिदेवित्थ । सुमुत्ता मयं तेन महासमणेन उपद्दुता च होम - 'इदं वो कप्पति, इदं वो न कप्पती' ति । इदानि पन मयं यं इच्छिस्साम तं करिस्साम, यं न इच्छिस्साम न तं करिस्सामा'' ति । अथ खो आयस्मा महाकस्सपो भिक्खू आमन्तेसि - ''अलं, आवुसो, मा सोचित्थ, मा परिदेवित्थ । ननु एतं, आवुसो, भगवता पटिगच्चेव अक्खातं - 'सब्बेहेव पियेहि मनापेहि नानाभावो विनाभावो अञ्ञथाभावो । तं कुतेत्थ आवुसो, लब्भा । यं तं जातं भूतं सङ्खतं पलोकधम्मं तं तथागतस्सा पि सरीरं मा पलुज्जी ति, नेतं ठानं विज्जती'' ति ।

*(दीघनिकाय - महापरिनिब्बाण सुत्त)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**सुभद्दो** - सुभद्र - हा सुभद्र इथे वेगळा आहे जो अविनयशील, अवितरागी असून अर्हत नाही, मात्र तथागतांचा अंतिम शिष्य हा वेगळा आहे जो अर्हत होता.

**सोचति** (क्रिया.) - शोक करणे

**सुमुत्त** (कृदन्त) - सुविमुक्त, चांगल्याप्रकारे विमुक्त

**कप्पति** (क्रिया.) - योग्य असणे

**करिस्साम** - करणार, करेन, करेल

**अलं** (अव्यय) - पर्याप्त

**आवुसो** (अव्यय, सम्बोधन पद) - मित्र! आयुष्मान!

**पिय** (वि.) - प्रिय

**नाना** (अव्यय) - अनेक, विविध, भिन्न-भिन्न

**विना** (अव्यय) - रहित

**कुतेत्थ** (क्रि.वि.) - कुठे

**जातं** (नपुं.) - उत्पन्न, घटित

**सङ्खत** (कृदन्त) - संस्कृत, समुत्पन्न

**पलुज्जी, पलुज्जति** - खाली पडतो, तुटून जातो

**विज्जति** (क्रिया.) - विद्यमान असणे

**परिदेव** - विलाप करणे, रडणे

**उपद्दुत** (कृदन्त) - उपद्रुत, उपद्रवी, कष्ट देणारा, त्रास देणारा

**इच्छति** (क्रिया.) - कामना करणे, इच्छा करणे

**अथ** (अव्यय) - तेव्हा

**ननु** (अव्यय) - निश्चित, निश्चयाने

**अक्खात** (क्रि.वि.) - व्याख्या केल्या गेलेला

**मनाप, मानसिक** (वि.) - मनोनुकूल, आकर्षक

**भाव** (पुं.) - स्वभाव

**अञ्ञथा** (अव्यय) - अन्यथा, दुसऱ्या प्रकारे

**लब्भा** (अव्यय) - शक्य, संभव

**भूत** (कृदन्त) - उत्पन्न झाला

**तथागत** (यथावादी, तथाकारी, यथाकारी, तथावादी) - जसे बोलतो तसे करतो, जसे करतो तसे बोलतो

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सुभद्र प्रव्रजिताने इतर भिक्खूंना काय म्हटले ?

(२) आयुष्मान महाकस्सपांनी भिक्खूंना कसे संबोधित केले ?

(३) या पाठाचा सारांश सांगा.

२. **खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सुभद्दो कुतो निसिन्नो होति ?

(२) महाकस्सपो भिक्खू किं आमन्तेसि ?

३. **रूपे ओळखा.**

तथागतस्स, आवुसो, करिस्साम ।

**टिपणे**

- 'पालि-तिपिटक' साहित्य निर्मितीची पार्श्वभूमी कथन करणे.
- तिपिटकाचे वर्गीकरण करा.

★★★